ePaper

| वर्ष - 6 | अंक - 168 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार | दिनांक 27 सप्टेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## शिंदे-फडणवीस सरकारचा मोठा निर्णय; राज्यात लवकरच पोलिसांची 20 हजार पदे भरणार







### शहर पदाधिकाऱ्यांची प्रदेशाध्यक्षांकडून 'कानउघडणी'

# 'आत्मकेंद्री' भूमिकेमुळे राष्ट्रवादीत 'दुफळी'!

## प्रदेशाध्यक्षांच्या बैठकीला आमदारांसह ज्येष्ठांची दांडी

| पुणे |
| महाईन्यूज | प्रतिनिधी |

**आगामी महापालिका निवडणूक तोंडावर असताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतील 'आत्मकेंद्री' भूमिकेमुळे 'दुफळी' निर्माण झाली असून, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी स्वत: पदाधिकाऱ्यांची कानउघडणी केली.**

**काळेवाडी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत सभासद नोंदणी आढावा बैठक झाली. यावेळी शहराध्यक्ष अजित गव्हाणे, माजी आमदार विलास लांडे, महिलांच्या पुणे विभागीय अध्यक्षा वैशाली नागवडे, माजी महापौर संजोग वाघेरे, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे आदी प्रमुख पदाधिकारी आदी उपस्थित होते.**



या बैठकीला आमदार अण्णा बनसोडे, ज्येष्ठ नेते आझम पानसरे, हनुमंत गावडे यांच्यासह माजी नगरसेवक मंगला कदम, मोरेश्वर भोंडवे, अपर्णा डोके, राजू मिसाळ, राजू बनसोडे, रोहीत काटे, समीर मासुळकर आदींनी थेट दांडी मारली. माजी आमदार विलास लांडे अल्पावधीसाठी उपस्थित राहीले. माजी महापौर योगेश बहल यांनीही अपेक्षीत वेळ दिला नाही.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या काळेवाडी येथे झालेल्या सभासद नोंदणी आढावा बैठकीला बहुतांश माजी नगरसेवकांनी दांडी मारल्याने प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचा पारा चढला. "मी दुसऱ्यांदा प्रदेशाध्यक्ष झालो आहे. पक्षसंघटना काय असते ते दाखवून देतो" असे सुनावत गैरहजर माजी नगरसेवकांची नावे पाठवून देण्याची सूचना शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांना केली आहे.

पाटील म्हणाले की, "नगरसेवक हे जनतेशी जोडलेले असतात. त्यांचा नागरिक, जनतेशी सर्वाधिक संबंध येतो. त्यामुळे त्यांना सभासद नोंदणी करणे सहज शक्य होते. ज्यांना आगामी महापालिका निवडणूक लढवायची आहे. त्यांनी अधिका अधिक सभासद नोंदणी करणे गरजेचे आहे, असेही पाटील यांनी सांगितले.

### आमदार अण्णा बनसोडेंसह ज्येष्ठांची अनुपस्थिती...

राज्यातील महाविकास आघाडीची सत्ता गेल्यापासून पिंपरीचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अण्णा बनसोडे हे पक्षापासून फटकून राहत असल्याचे दिसून येत आहे. त्याचा प्रत्यय सोमवारी पुन्हा आला. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत काळेवाडी येथे झालेल्या सभासद आढावा बैठकीकडेही आमदार बनसोडे यांनी पाठ फिरवली. त्यामुळे बनसोडे पक्षावर नाराज आहेत, हे निश्चित झाले आहे. जून मध्ये झालेल्या राज्यसभा निवडणुकीवेळी उशिराने केलेले मतदान, नवीन सरकारचा विश्वासदर्शक ठराव, विधानसभा अध्यक्ष निवडणुकीतही आमदार बनसोडे गैरहजर होते. त्यामुळे राजकीय चर्चेला उधाण आले आहे.

> **"क्रियाशील ३०० सदस्य करणाऱ्यांना महापालिका निवडणुकीसाठी पक्षाचे तिकीट दिले जाईल. केंद्रात, राज्यात सत्ता नाही मग आता पक्षाच्या बैठकीला कशाला जायचे असे ज्यांना वाटते. त्यांनी गेलेली सत्ता कधीही येवू शकते. टाईम कधीही बदलू शकतो हे लक्षात ठेवावा,"**
>
> **-जयंत पाटील, प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी**

---

# 'स्मार्ट सिटी' तील प्रकल्प कालमर्यादेत पूर्णत्वाकडे!

## आढावा बैठक : विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी व्यक्त केले समाधान

| पिंपरी चिंचवड |
| महाईन्यूज | प्रतिनिधी |

पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडच्या संचालक मंडळाची २० वी बैठक विभागीय आयुक्त सौरव राव यांच्या स्मार्ट सिटी कार्यालय, ऑटो क्लस्टर, चिंचवड येथे पार पडली. या बैठकीमध्ये विविध विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यात आले. यावेळी, महापालिका आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मा. शेखर सिंह, नामनिर्देशक संचालक (GOI) श्रीम. ममता बत्रा, स्वतंत्र संचालक श्री. यशवंत भावे, श्री. प्रदीपकुमार भार्गव, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त मा. श्री. अंकुश शिंदे (ऑनलाईन), सहमुख्य



कार्यकारी अधिकारी श्री. किरणराज यादव, शहर अभियंता श्री. मकरंद निकम, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी श्री. निळकंठ पोमण, मुख्य वित्तीय अधिकारी श्री. सुनिल भोसले, कंपनी सेक्रेटरी श्रीम. चित्रा पंवार, महाव्यवस्थापक श्री. अशोक भालकर, कार्यकारी अभियंता श्री. मनोज सेठीया, सहा.मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मीकांत कोल्हे यांच्यासह अधिकारी तसेच सल्लागार प्रतिनिधी उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये विविध विषयांवर संचालक मंडळाने चर्चा केली. तसेच, स्मार्ट सिटी प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेतला. प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निश्चित केलेल्या कालमयदिबाबत संचालक मंडळाने समाधान व्यक्त केले. तसेच, मे. टेक महिंद्रा आणि मे. एल अँड टी कंपनीच्या प्रतिनिधींसोबत प्रत्यक्ष चर्चा करून प्रकल्प अंमलबजावणीबाबत सूचना देण्यात आल्या. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचा ताळेबंद मंजूर करून वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीसाठी शिफारस करण्यात आली. तसेच, कंपनीची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. ३० सप्टेंबर २०२२ रोजी आयोजित करण्यास या बैठकीत मान्यता देण्यात आली. या बैठकीमध्ये प्रकल्प सल्लागार यांनी स्मार्ट सिटी अंतर्गत सुरु असलेल्या विकास प्रकल्पांचे भौतिक व आर्थिक प्रगतीबाबत सादरीकरण केले. त्यावर संचालक मंडळाद्वारे चर्चा होवून पुढील कार्यवाहीबाबत निर्णय घेण्यात आले. कंपनी सेक्रेटरी चित्रा पंवार यांनी उपस्थितांचे स्वागत करून आभार मानले.

> **सदर बैठकीमध्ये विविध विषयांवर संचालक मंडळाने चर्चा केली. तसेच, स्मार्ट सिटी प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेतला. प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निश्चित केलेल्या कालमर्यादेबाबत संचालक मंडळाने समाधान व्यक्त केले. तसेच, मे. टेक महिंद्रा आणि मे. एल अँड टी कंपनीच्या प्रतिनिधींसोबत प्रत्यक्ष चर्चा करून प्रकल्प अंमलबजावणीबाबत सूचना देण्यात आल्या. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचा ताळेबंद मंजूर करून वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीसाठी शिफारस करण्यात आली. तसेच, कंपनीची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. ३० सप्टेंबर २०२२ रोजी आयोजित करण्यास या बैठकीत मान्यता देण्यात आली.**

## शॉर्ट न्यूज

### मेट्रोच्या सीबीटीसी चाचणीला प्रारंभ



।पुणे। महाईन्यूज ।

मेट्रोचा प्रवास वेगवान आणि सुरक्षित होण्याच्या दृष्टीने जागतिक दर्जाची अत्याधुनिक कम्युनिकेशन बेस ट्रेन कंट्रोल सिग्नलिंग सिस्टिमच्या (सीबीटीसी) चाचणीला सुरुवात झाली आहे. मेट्रोच्या वनाज ते रामवाडी या मार्गिकेवर ही चाचणी सध्या सुरू असून या प्रणालीमुळे दर दोन मिनिटाला ट्रेन सोडणे शक्य होणार आहे. तसेच प्रत्येक ट्रेनमध्ये सुरक्षित अंतर ठेवून त्यांचे संचलन करणे शक्य होणार आहे. मेट्रो स्वयंचलित पद्धतीने धावणार असून ट्रेन सुरू करणे, तिचा वेग वाढविणे, ती फलाटावर नियोजित जागेवर थांबविणे ही सर्व कामे स्वयंचलीत पद्धतीने होणार आहेत. सीबीटीसी प्रणालीमध्ये रेडिओ कम्युनिकेशनद्वारे ट्रेनच्या स्थानाची, वेगाची आणि इतर अन्य महत्वाची माहिती ट्रेनमधील संगणकात उपलब्ध होणार आहे.

# खासगी महाविद्यालयांनी शुल्क कमी करावं, आम्ही प्राध्यापकांचे वेतन देतो!

## उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची भूमिका

।पुणे। महाईन्यूज ।

राज्य सरकार उच्च शिक्षणाची जबाबदारी खासगी संस्थांवर ढकलून मोकळे झाले. राज्यातील खासगी महाविद्यालये जास्त शुल्क आकारत असल्याने शिक्षण महागडे झाले आहे. या शुल्कातून प्राध्यापकांचे वेतन करत असल्याचे महाविद्यालयांकडून सांगितले जाते. मात्र राज्य सरकार खासगी महाविद्यालयांतील प्राध्यापकांच्या वेतनाची जबाबदारी घेईल, महाविद्यालयांनी शुल्क कमी करावे, अशी भूमिका राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी मांडली. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न महाविद्यालयातील शैक्षणिक



उपक्रमांचे उद्घाटन डिजिटल पद्धतीने पाटील यांच्या हस्ते झाले. त्यानंतर ते बोलत होते. संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे. अध्यक्ष विघ्नहरी महाराज देव, आमदार सिद्धार्थ शिरोळे, कार्यवाह डॉ. शामकांत देशमुख, सहकार्यवाह डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, सुरेश तोडकर आदी या वेळी उपस्थित होते.

पाटील म्हणाले, उच्च शिक्षणासाठी १२ हजार कोटी खर्च होतात. खासगी महाविद्यालयांतील प्राध्यापकांच्या वेतनासाठी आणखी हजार रुपये लागतील. ते उपलब्ध करता येतील, पण गुणवत्तापूर्ण शिक्षण स्वस्तात मिळणे आवश्यक आहे. अन्यथा शिक्षण काही जणांसाठीच मर्यादित राहील. शुल्क निर्धारण प्राधिकरणाने शुल्क मान्य केलेल्या महाविद्यालयांपैकी १० टक्के महाविद्यालयांना भेट देऊन प्रत्यक्ष खर्चाची पाहणीच करणार आहे. शिक्षणामध्ये होणारा गैरव्यवहार अतिशय वाईट आहे.

नव्या शैक्षणिक धोरणाला अनुसरून राज्यातील शंभर महाविद्यालयांमध्ये कॉम्बो अभ्यासक्रम राबवण्याची योजना आहे. ज्यात ७० टक्के करिअरसाठीचा अभ्यासक्रम, तर ३० टक्के विद्यार्थ्यांच्या आवडीचे विषय शिकवले जातील, असेही पाटील यांनी नमूद केले.

### विद्यापीठ कायद्यातील बदल मान्य नाहीत

**महाविकास आघाडीने विद्यापीठ कायद्यात केलेले बदल मान्य नाहीत. त्यामुळे शासनाने तो कायदा आता परत मागवला आहे. या बदलांना मान्यता दिली जाणार नाही, असेही पाटील म्हणाले.**

### पुण्याने बाहेरचा म्हटले, पण पालकमंत्री झालो

**माझे वडील गिरणीकामगार होते, आता वस्त्रोद्योगमंत्री झालो, शिक्षण क्षेत्रात वीस वर्षांहून अधिक काळ काम केले आणि उच्च शिक्षण मंत्री झालो. पुण्याने मला बाहेरचा, उपरा म्हटले पण आता पुण्याचा पालकमंत्री झालो, अशी टिप्पणीही पाटील यांनी केली.**

### शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी जोमाने

**महाविकास आघाडीच्या काळात शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी ठप्प होती. मात्र आता केंद्र सरकारनुसार धोरणाची जोमाने अंमलबजावणी करण्यात येईल, असेही त्यांनी नमूद केले.**

# महावितरणच्या धडक मोहिमेत सर्वाधिक वीजचोऱ्या बारामतीत



।पुणे। महाईन्यूज ।

महावितरणच्या वतीने पुणे प्रादेशिक विभागामध्ये वीजचोरी विरोधात राबविण्यात आलेल्या एक दिवसाच्या मोहिमेमध्ये पुणे, बारामती आणि कोल्हापूर परिमंडळात वीजचोरीची दीड हजार प्रकरणे उघडकीस आली आहेत. त्यात सर्वाधिक वीजचोऱ्या बारामती परिमंडळात सापडल्या आहेत. महावितरणचे प्रदेशिक संचालक अंकुश नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली वीजचोऱ्यांविरुद्धची एकदिवसीय मोहीम राबविण्यात आली. पुणे, बारामती आणि कोल्हापूर परिमंडळामध्ये एकाच वेळी विविध पथकांनी संशयास्पद ठिकाणी जाऊन वीजजोडांची पाहणी केली. तीनही परिमंडळाच या मोहिमेमध्ये वीजचोरीची १५०१ प्रकरणे उघडकीस आली. बारामती परिमंडळात त्यातील सर्वाधिक ८९३ प्रकरणे आहेत. पुणे परिमंडळात १७४, तर कोल्हापूर परिमंडळात ४३४ वीजचोरीची प्रकरणे उघडकीस आली. मोहिमेमध्ये एकूण ११ हजारांहून अधित वीज जोडण्यांची तपासणी करण्यात आवी. त्यात प्रत्यक्षात वीजचोरी आढळून आलेल्या प्रकरणांमध्ये विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १३५ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे या मोहिमेत अनधिकृतपणे वीजवापराचीही प्रकरणे उघडकीस आली आहेत. अशा ३४८ प्रकरणांमध्ये विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १२६ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती महावितरणकडून देण्यात आली.

# पीएफआय'च्या कार्यकर्त्यांवर गुन्हे

## संघटनेवर बंदीबाबतचा निर्णय केंद्राकडे : फडणवीस



। पुणे । महाईन्यूज

पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय) या संघटनेच्या आंदोलकांवर पुणे पोलिसांनी प्राथमिक तपासानुसार रविवारी सामाजिक तेढ निर्माण केल्याचा गुन्हा नोंदवला. या प्रकरणाची सखोल चौकशी करून या संघटनेवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याबाबतच्या सूचना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणे पोलिसांना दिल्या. संघटनेवर बंदी घालण्याबाबत केंद्र सरकार निर्णय घेईल, असे फडणवीस यांनी सांगितले.

'पीएफआय'च्या कार्यकर्त्यांनी आंदोलनावेळी पाकिस्तान समर्थनार्थ घोषणाबाजी केल्याची चित्रफीत प्रसारित झाली होती. त्याचे शहरात तीव्र पडसाद उमटले आहेत. यासंदर्भात भाजपने पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता यांना निवेदन दिले, तर महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि युवा सेनेकडून आंदोलने करण्यात आली. फडणवीस यांनी याबाबत देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याबाबत पोलिसांशी चर्चा केली. प्राथमिक तपासानुसार १५३ (अ), (दोन गटात व धर्मात तेढ निर्माण करणे), १५३ (ब), (देशाच्या अखंडतेवर प्रतिकूल प्रभाव टाकणारी बदनामीकारक वक्तव्ये), १०९ (गुन्हा करण्यासाठी प्रवृत्त करणे) आणि १२० (ब), (कट रचणे) अशी विविध कलमे 'पीएफआय'वरील गुन्ह्यात अंतर्भूत करण्यात आली आहेत, अशी माहिती पोलीस उपायुक्त राहुल पाटील यांनी दिली. ही चित्रफित न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठविण्यात आली असून, अहवालानंतर पुढील गुन्ह्यांबाबत निर्णय घेण्यात येईल. पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया संघटनेच्या कार्यकर्त्यांना केंद्रीय आणि राज्यातील तपास यंत्रणेने गुरुवारी ताब्यात घेतले. त्याच्या निषेधार्थ पुण्यात शुक्रवारी 'पीएफआय' संघटनेच्या समर्थकांनी आंदोलन केले होते. त्या वेळच्या प्रसारित झालेल्या चित्रफितीमध्ये आंदोलक विविध घोषणा देताना दिसत आहेत. 'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया जिंदाबाद', 'अल्लाहू अकबर' अशा घोषणा दिल्या जात होत्या. दरम्यान, या आंदोलनाच्या वेळी 'पाकिस्तान जिंदाबाद' अशा घोषणा दिल्याचा दावा करीत चित्रफीत प्रसारित झाली होती.

> परवानगी नसताना आंदोलकांनी जमाव जमवून आंदोलन केले होते. या प्रकरणात आता भादंवि कलम १५३ ए, १५३ ब, १०९, १२० ब, अशा विविध कलमांची वाढ केली असून, पुढील तपास सुरू आहे.
>
> **– प्रताप मानकर, वरिष्ठ निरीक्षक, बंडगार्डन पोलीस ठाणे.**

> देशविरोधी घोषणा खपवून घेतल्या जाणार नाहीत. काही वर्षे सातत्याने तपास करून, पुरावे जमा करून 'पीएफआय'वर कारवाई करण्यात आली आहे. यापूर्वीही राज्यात गृहमंत्री असताना त्यांच्या कृतीवर लक्ष ठेवून होतो.
>
> **– देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**

### चित्रफितीची न्यायवैद्यक तपासणी

**'पीएफआय'च्या आंदोलनप्रकरणी गुन्ह्यांच्या कलमांमध्ये रविवारी वाढ करण्यात आली. आंदोलनानंतर 'पाकिस्तान जिंदाबाद'च्या घोषणा देणारी एक चित्रफीत प्रसारित झाली होती. त्याची सत्यता आता न्यायवैद्यक प्रयोगशाळेकडून तपासण्यात येणार असल्याची माहिती पुणे पोलिसांनी दिली.**

# अधिकार वाटपात 'डरकाळी'!

## जितेंद्र वाघ यांना झुकते माप : जांभळेंना दुय्यम, तर जगताप 'जैसे थे'

पिंपरी ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासक तथा आयुक्तांनी अतिरिक्त आयुक्तांच्या कामकाजाचे नव्याने वाटप केले आहे. बहुप्रतिक्षित आणि बहुचर्चित अशा विभाग वाटपात जितेंद्र वाघ यांना झुकते माप देण्यात आले आहे. तसेच, नवनियुक्त अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे यांच्याकडे तुलनेने दुय्यम विभाग तर, उल्हास जगताप यांच्याकडील विभागाची परिस्थिती 'जैसे थे' आहे.**

महापालिकेचा 'ब' वर्गात समावेश झाल्यामुळे तीन अतिरिक्त आयुक्तांची पदे निर्माण झाली आहेत. प्रतिनियुक्तीवरील अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे यांची बदली झाली. त्यांच्याजागी प्रदीप जांभळे रुजू झाले आहेत. त्यामुळे आयुक्त शेखर सिंह कामकाजाचे वाटप कसे करतात याकडे प्रशासकीय वर्तुळाचे लक्ष लागले होते. त्यानुसार आज शासकीय सुट्टीच्यादिवशीही आयुक्तांनी कामकाजाची विभागणी केली. लेखा, अमृत, स्मार्ट सिटी, जेएनएनयूआरएमचे विशेष प्रकल्प, नगररचना आणि दक्षता व गुणनियंत्रण या सर्व विभागांचे कामकाज आयुक्त स्वतः पाहणार आहेत.

अतिरिक्त आयुक्त (एक) जितेंद्र वाघ यांच्याकडे 'हे' आहेत विभाग! प्रशासन, माहिती व तंत्रज्ञान, बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण,



पशुवैद्यकीय, बहिणाबाई चौधरी प्राणी संग्रहालय, क्रीडा, स्थापत्य मुख्यालय, स्थापत्य (प्रकल्प), वैद्यकीय मुख्य कार्यालय, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय, आरोग्य, आकाशचिन्ह व परवाना विभाग, निवडणूक, जनगणना, भूमि आणि जिंदगी, पर्यावरण अभियांत्रिकी अशा 14 विभागाचे कामकाज त्यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. अतिरिक्त आयुक्त (दोन) प्रदीप जांभळे यांच्याकडील विभाग!

उद्यान व वृक्षसंवर्धन, अग्निशमन, शिक्षण, माध्यमिक शिक्षण, स्थापत्य (उद्यान), कायदा, कामगार कल्याण, अतिक्रमण, स्थानिक संस्था कर (एलबीटी), बीआरटीएस प्रकल्प, विद्युत, करसंकलन, पाणीपुरवठा व जलनिःसारण, जलशुद्धीकरण केंद्र सेक्टर 23, मध्यवर्ती भांडार असे 15 विभाग त्यांच्याकडे सोपविण्यात आले आहेत.

अतिरिक्त आयुक्तांनी या विभागांसाठी आयुक्तांच्या सर्व अधिकारांचा वापर करावा. विभागाची कर्तव्ये व कार्ये पार पाडावी. तथापि, त्यांच्या अखत्यारीतील विभागाअंतर्गतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासंबंधिचे महापालिका, स्थायी समिती सभा यांना सादर करावयाचे सर्व प्रस्ताव आयुक्तांची मान्यता घेऊनच सादर करण्यात येतील. या अधिकारामध्ये बदल करणे अथवा निरस्त करण्याचे हक्क आयुक्तांनी स्वतः कडे राखून ठेवले आहेत.

### अतिरिक्त आयुक्त (तीन) उल्हास जगताप यांच्याकडील विभाग!

**सुरक्षा, समाज विकास, कार्यशाळा, नगरसचिव, माहिती व जनसंपर्क, झोनिपू, झोनिपू (स्थापत्य), आयटीआय मोरवाडी व कासारवाडी, नागरी सुविधा केंद्र, अभिलेख कक्ष, बीएसयुपी, ईडब्ल्यूस प्रकल्प, 8 क्षेत्रीय कार्यालये, सार्वजनिक वाचनालय, प्रेक्षागृह आणि आपत्ती व्यवस्थापन अशा 13 विभागाचे कामकाज जगताप यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले आहे.**

# आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांची मस्ती वाढलीय!

## राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची सडकून टीका

पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**राज्याचे आरोग्य मंत्री तानाजी सावंत हे समस्त मराठा समाजाबाबत जे बोलले आहेत, ते अतिशय गंभीर आणि निषेधार्ह आहे. सावंत ज्या आत्मविश्वासाने बोलतात. त्यावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना बोलण्याचे अधिकार दिल्याचे स्पष्ट दिसते. सावंत यांना पुढे करून भाजपचे लोक बोलतात. थोडक्यात काय तर सावंत यांची मस्ती वाढली आहे, असा हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केला. दरम्यान, आत्ताच मराठा आरक्षणाच्या विषयाची खाज का निर्माण झाली असे वादग्रस्त विधान सावंत यांनी केले होते.**





काळेवाडी येथे पत्रकार परिषदेत आज (सोमवारी) पाटील बोलत होते. शहराध्यक्ष अजित गव्हाणे, माजी आमदार विलास लांडे, माजी महापौर संजोग वाघेरे, कार्याध्यक्ष राहुल भोसले, फजल शेख, पिंपरी विधानसभा अध्यक्ष श्याम लांडे, चिंचवडचे अध्यक्ष विनोद नढे, भोसरीचे पंकज भालेकर, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, भाऊसाहेब भोईर आदी उपस्थित होते.

पीआयएफ संघटनेच्या कार्यकर्त्यांची देशभरात धरपकड सुरू आहे. या संघटनेचे कार्यकर्ते पुण्यात पाकिस्तान जिंदाबादच्या घोषणा देत असतील तर हे अतिशय गंभीर आहे.(JAYANT PATIL) घोषणाबाजी करणाऱ्यांवर सरकारने ताबडतोब कारवाई केली पाहिजे अशी मागणी करत जयंत पाटील म्हणाले, भाजपच्या राजवटीत हे घडतेय हे त्याहून अधिक गंभीर आहे. असे प्रकार घडत असताना गुप्तचर यंत्रणा काय करत होत्या? असा प्रश्न निर्माण होतो. कायदा सुव्यवस्थेवर भाजपचे अजिबात लक्ष नाही. निवडणूक आयोग, न्यायालय याशिवाय भाजपचे दुसरीकडे कुठेच लक्ष नाही.

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार विधिमंडळात चांगले काम करतात. जनतेचे प्रश्न मांडतात. राजकारणात भाजपला राष्ट्रवादीची सर्वाधिक भीती वाटते. भाजपच्या आमदारांची संख्या 120 वरून 105 वर आली होती. राज्यातील सध्याचे वातावरण बघता 105 वरून 80 पर्यंत खाली घसरेल अशी परिस्थिती आहे. त्यामुळेच भाजपकडून राष्ट्रवादीला लक्ष्य केले जात असल्याचेही पाटील म्हणाले.

**पीआयएफ संघटनेच्या कार्यकर्त्यांची देशभरात धरपकड सुरू आहे. या संघटनेचे कार्यकर्ते पुण्यात पाकिस्तान जिंदाबादच्या घोषणा देत असतील तर हे अतिशय गंभीर आहे.(JAYANT PATIL) घोषणाबाजी करणाऱ्यांवर सरकारने ताबडतोब कारवाई केली पाहिजे अशी मागणी करत जयंत पाटील म्हणाले, भाजपच्या राजवटीत हे घडतेय हे त्याहून अधिक गंभीर आहे. असे प्रकार घडत असताना गुप्तचर यंत्रणा काय करत होत्या? असा प्रश्न निर्माण होतो. कायदा सुव्यवस्थेवर भाजपचे अजिबात लक्ष नाही. निवडणूक आयोग, न्यायालय याशिवाय भाजपचे दुसरीकडे कुठेच लक्ष नाही.**

**राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार विधिमंडळात चांगले काम करतात. जनतेचे प्रश्न मांडतात. राजकारणात भाजपला राष्ट्रवादीची सर्वाधिक भीती वाटते. भाजपच्या आमदारांची संख्या 120 वरून 105 वर आली होती. राज्यातील सध्याचे वातावरण बघता 105 वरून 80 पर्यंत खाली घसरेल अशी परिस्थिती आहे. त्यामुळेच भाजपकडून राष्ट्रवादीला लक्ष्य केले जात असल्याचेही पाटील म्हणाले.**

### न्याय व्यवस्थेवर आमचा विश्वास...

**शिवसेना आणि शिंदे गटाच्या याचिकांवर उद्या सर्वोच्च न्यायालयातील घटनापीठापुढे महत्वाची सुनावणी आहे. त्याबाबत विचारले असता पाटील म्हणाले, देशात न्याय असेल. न्यायव्यवस्था शिल्लक असेल तर राज्य घटनेच्या 10 सुचिनुसार पक्षा आदेशाविरोधात मतदान केलेल्यांची आमदारकी रद्द होणे अपेक्षित आहे. न्यायालयाच्या निर्णयाकडे आमचेही लक्ष असून त्याबाबत कुतूहल आहे. न्याय व्यवस्थेवर विश्वास वाटावा असा निकाल येईल. आणि आमचा विजय होईल अशी खात्री आहे, असेही जयंत पाटील यांनी म्हटले आहे.**

## संपादकीय »

# साथ आणि संवाद

***गुरुवारी दिल्लीत कस्तुरबा गांधी मार्गावरील मशिदीत मोहन भागवत 'हिंदू आणि मुस्लिम यांचा डीएनए एकच आहे,' असे म्हणत होते; तेव्हा राष्ट्रीय तपास यंत्रणा म्हणजे एनआयए देशभरात व्यापक कारवाईत शंभराहून अधिक संशयितांना जेरबंद करीत होती.***

'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' असे साळसूद नाव घेऊन देशविरोधी कारवाया करणाऱ्या कट्टर इस्लामी संघटनेवर देशव्यापी छापे पडावेत, त्याच दिवशी सरसंघचालक मोहन भागवत यांनी राजधानीत एका मशिदीत जाऊन इमामांशी आणि मुस्लिम नागरिकांशी चर्चा करावी आणि नेमक्या त्याच दिवशी 'पॉप्युलर फ्रंट'चे मोठे जाळे असणाऱ्या महाराष्ट्रात मुस्लिमांचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचविण्यासाठी राज्य सरकारने अभ्यासगट स्थापन करावा, हा कुणालाही विलक्षण योगायोग वाटेल. तसा तो असला तरी या तीनही घटनांच्या मागे एक निश्चित सूत्र आहे. गरीब, अविकसित मुस्लिम समाजाला संवाद साधून सोबत घ्यायचे आणि त्याचवेळी, दहशती वृत्तीला नेस्तनाबूत करायचे, असे हे सूत्र आहे. ते विचारपूर्वक ठरलेले दिसते. भागवत यांनी मागे राजधानीत जी तीन व्याख्याने दिली; तेव्हापासून या प्रयत्नांना वेग आला आहे. गुरुवारी दिल्लीत कस्तुरबा गांधी मार्गावरील मशिदीत मोहन भागवत 'हिंदू आणि मुस्लिम यांचा डीएनए एकच आहे,' असे म्हणत होते; तेव्हा राष्ट्रीय तपास यंत्रणा म्हणजे एनआयए देशभरात व्यापक कारवाईत शंभराहून अधिक संशयितांना जेरबंद करीत होती. 'पीएफआय'वरील ही कारवाई इतकी मोठी आणि नियोजनपूर्वक झाली आहे की, या संघटनेची पाळेमुळे खणून काढण्याचा निर्धार त्यातून दिसतो. त्याचे स्वागत करायला हवे. अशी कारवाई म्हणजे त्या समाजाच्या विरोधातली कारवाई नसते. मात्र, यापूर्वी अनेकदा अशा संशयितांची धरपकड म्हणजे त्या समाजावरचा हल्ला, असे चित्र निर्माण केले गेले. त्यात अनेकांचा राजकीय स्वार्थही होता. भागवत यांनी साधलेल्या संवादाकडे या दृष्टीनेही पाहायला हवे.

इतका विविधतेने नटलेला, अनेक पंथ अनुसरणारा आणि भारतीय संस्कृतीचे विविध आविष्कार दाखविणारा इस्लाम जगाच्या पाठीवर इतरत्र कुठेही नाही. मात्र, इस्लामला मोनोलिथ म्हणजे एकाश्म बनवून टोकेरी, कडवट, असहिष्णू करत नेणे, हाच कडव्या संघटनांचा उद्देश असतो. हिंदूंनाही हा धोका नाही, असे नाही. 'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' देशभर हेच करीत होती. कडव्या इस्लामचा पुरस्कार, नामानिराळे राहून हत्या घडवणे आणि दंगलसदृश वातावरण धगधगत ठेवणे, ही कामे फ्रंट करीत होती. पुढच्या काही दशकांत संपूर्ण भारत इस्लामी करण्याचे उद्दिष्ट फ्रंटने समोर ठेवले होते. हे होणे अशक्य आहे, हे सर्वांना माहीत असले तरी अशी वेडगळ ध्येये ठेवली की तरुणांच्या डोक्यात विखार आणि इंधन भरणे सोपे जाते. गेल्या काही महिन्यांमध्ये भारतात 'धर्मद्रोहाचा ठपका ठेवून' थंड डोक्याने ज्या हत्या झाल्या, त्यामागे ही 'मेंदूधुलाई'ची कार्यपद्धती होती.



## आनंदी सकाळ

# सर्वे सन्तु निरामयाः। सर्वे भद्राणि पश्यन्तु।

महाभारतात आपण वाचतो की, ज्या वेळेला ज्यांनी ज्यांनी धर्माचरण केले, त्या त्या वेळेला तो तो विजयी झाला. धर्माचरणात ज्यांनी कुठेतरी शबलता निर्माण केली, भेसळ केली त्या क्षणाला तो पराभूत झाला. भीष्माचार्य व अर्जुन यांच्या युद्धात लौकिक अर्थाने भीष्माचार्य पडले.पण त्यांना मारण्यासाठी अर्जुनाने त्यांच्याच सांगण्याप्रमाणे शिखंडीला समोर उभे केले. स्वतः केलेल्या प्रतिज्ञेमुळे भीष्माचार्यांनी शस्त्र खाली ठेवले. धर्माचरण केले. नैतिक विजय भीष्माचार्यांचाच झाला. 'भीष्मप्रतिज्ञा' हा शब्द रूढ आहे. आपण 'धर्मप्रतिज्ञा' असे म्हणत नाही, तर 'भीष्मप्रतिज्ञा' म्हणतो. कारण, 'भीष्मप्रतिज्ञे'मध्येच धर्म आहे. धर्माचे रक्षण केल्यामुळे भीष्माचार्य अजरामर झाले. भगवान श्रीकृष्णाच्या आज्ञेवरून पांडवांनी भीष्माचार्यांकडूनच धर्माचे सम्यक ज्ञान प्राप्त करून घेतले.

# 'सायबर' गुन्ह्यांचे आव्हान!




सध्या गुन्ह्यांचे स्वरूप बदलले आहे. रस्त्यावरील गुन्हेगारी कमी झाली असून, गुन्हेगारांचा कल कमी जोखमीच्या सायबर क्षेत्राकडे वळला आहे. त्यामुळे सायबर फसवणूक रोखण्यासाठी सावधगिरी आणि सायबर साक्षरता हाच उपाय आहे.

इंटरनेटमुळे दैनंदिन जीवन सुलभ बनले आहे आणि वेळेची बचतही होत आहे. मात्र, या सायबर विश्वात वावरताना कोणती काळजी घ्यावी, काय करावे, काय करू नये याबाबत पुरेसे ज्ञान नसल्याने या विश्वात टपून बसलेले सायबर चोर संधी मिळताच हल्लाबोल करीत आहेत. पकडले जाण्याची जोखीम कमी आणि फायदाच फायदा असल्याने आर्थिक फसवणूक, सेक्सटॉर्शन, बदनामी, सोशल पाठलाग, अल्पवयीन मुलांचे लैंगिक शोषण



असे सायबरमधील गुन्हे इतर गुन्ह्यांच्या तुलनेत कित्येक पटीने वर्षागणिक वाढत आहेत.

नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्यूरोने देशभरातील सायबर गुन्ह्यांची जारी केलेली आकडेवारी पाहिली तर हा विषय किती गंभीर आहे याची कल्पना येते. देशभरात २०२१ मध्ये ५० हजार ९७४ सायबर गुन्ह्यांची नोंद करण्यात आली. हा आकडा २०२० च्या तुलनेत जवळपास सहा टक्क्यांनी अधिक आहे. महाराष्ट्राचा विचार केला तर २०२१ मध्ये ५५६२ गुन्हे दाखल असून, सायबर गुन्ह्यांमध्ये राज्य चौथ्या क्रमांकावर आहे. सर्वांत चिंताजनक बाब म्हणजे महिला, लहान मुले यांच्या वेगवेगळ्या प्रकारच्या लैंगिक शोषणाबाबत नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्यूरोच्या आकडेवारीनुसार राज्यात ४८७ गुन्हे आहेत आणि या प्रकारच्या गुन्ह्यांची संख्या महाराष्ट्रात सर्वाधिक आहे. सोशल मीडियाच्या व्यासपीठावर १३ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांचा बऱ्यापैकी वावर असतो. अमेरिका, तसेच पाश्चात्त्य देशांमध्ये सोशल मीडिया वापरण्यासाठी १३ वर्षे पूर्ण हवीत. मात्र, आपल्याकडे यासाठी कोणतेही नियम, अटी अथवा कायदे नाहीत. या वयोगटातील मुले अल्पवयीन, कमी समज असलेली आणि इंटरनेटबद्दल पुरेसे ज्ञान नसलेली असतात. अशा मुलांना प्रेमाच्या जाळ्यात ओढले जाते. त्यांना वेगवेगळी आमिषे दाखवून आपलेसे करून त्यांचे लैंगिक शोषण केले जाते. त्यातूनच चाइल्ड पोर्नोग्राफी, 'सेक्सटॉर्शन' यांसारखे गंभीर गुन्हे जन्माला आले आहेत. चाइल्ड पोर्नोग्राफी रोखण्यासाठी केंद्र सरकारने कडक कायदे केल्यानंतर, त्याबाबत धडक कारवाया सुरू आहेत. चाइल्ड पॉर्न व्हिडिओ किंवा त्यासंबंधी कोणता व्हिडिओ, फोटो तुम्ही कुणाला पाठवला तर तुम्हाला जेलमध्ये जावे लागू शकते. हे रोखण्यासाठी अमेरिकेच्या 'नॅशनल सेंटर ऑफ मिसिंग अँड एक्स्प्लॉयटेड चिल्ड्रन'(एनमॅक) ही संस्था चाइल्ड पोर्नोग्राफीच्या विरोधात कार्यरत आहे. समाजमाध्यमे, संकेतस्थळांवरील चाइल्ड पोर्नोग्राफीबाबत ही संस्था अमेरिकेच्या 'फेडरल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन'(एफबीआय) या सर्वोच्च तपास यंत्रणेला माहिती पुरवते. भारतातून अशा ध्वनिचित्रफिती किंवा मजकूर जाहीर करणाऱ्या व्यक्तींची तांत्रिक माहिती पुरवण्याबाबत या संस्थेशी केंद्रीय गृह मंत्रालयाच्या राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाने (एनसीआरबी) करार केला आहे.

# पाऊस : गणित बिघडवणारा...

**मान्सूनचा मोसम संपला असा सार्वत्रिक समज झाला असताना सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यातील संततधार पावसाने बड्या शहरांतील पायाभूत सुविधांना आणि पावसाअभावी सिंचनाच्या आधाराने उभ्या राहिलेल्या पिकांना तडाखा देत उत्तर भारताचे आर्थिक गणित बिघडवले आहे.**

यंदा उत्तर भारतातील लोकांच्या वाट्याला पावसाळ्यातील 'अच्छे दिन' आलेच नाहीत. जूनपासून सप्टेंबरच्या मध्यापर्यंत उन्हाळा आणि उकाड्याने शहरी भागातील जनतेला त्रस्त केले. सप्टेंबरच्या मध्यापर्यंत पावसाने दडी मारल्यामुळे पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान या राज्यांतील अनेक जिल्ह्यांमध्ये दुष्काळसदृश स्थिती निर्माण झाली. मान्सूनचा मोसम संपला असा सार्वत्रिक समज झाला असताना सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यातील संततधार पावसाने बड्या शहरांतील पायाभूत सुविधांना आणि पावसाअभावी सिंचनाच्या आधाराने उभ्या राहिलेल्या पिकांना तडाखा देत उत्तर भारताचे आर्थिक गणित बिघडवले आहे.

हवामानाचा अचूक अंदाज ग्रामीण भागात जेवढा शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरतो, तेवढाच तो शहरी भागात महापालिका प्रशासनातील भ्रष्टांसाठीही मार्गदर्शक ठरत असतो. पाऊस पडणार नसेल तर त्यांना नालेसफाईसारखी कामे कागदोपत्री उरकून आपले उखळ पांढरे करून घेता येते. अवघ्या



काही तासांच्या पावसामुळे बड्या-बड्या शहरांची लाज निघणे हा आता निसर्गाचा इव्हेंट झाला आहे. वरकरणी चकाचक दिसणाऱ्या पायाभूत सुविधांच्या अंतरंगात काय दडले आहे, हे दाखविण्यासाठी काही तासांचा मुसळधार पाऊस पुरेसा ठरतो. बंगळुरूपाठोपाठ राष्ट्रीय राजधानी परिसरातील दिल्ली, गुरुग्राम, नोइडा, गाझियाबाद, फरिदाबादसह प्रमुख शहरांमध्ये बेमोसमी पावसाने शहरी नियोजनाचे वस्त्रहरण केले. पण महापालिकांमधील भ्रष्ट अधिकाऱ्यांची शरम ओसरलेल्या पावसाच्या पाण्यासोबत एक-दोन दिवसांतच विरून गेली. करोना संकटाच्या काळात रूढ झालेली 'वर्क फ्रॉम होम'ची संकल्पना उपयुक्त ठरल्यामुळे अशा आकस्मिक नैसर्गिक संकटांचा सरकारी वा खासगी क्षेत्राच्या कामकाजावर फारसा प्रतिकूल परिणाम होत नाही. त्यामुळे नागरी सुविधांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी असलेले महापालिकांच्या प्रशासन आणखीच सोकावते. त्याची किंमत सर्वसामान्यांना चुकवावी लागते. इंडिया गेट ते राष्ट्रपती भवनादरम्यानच्या 'कर्तव्यपथा'ची जाणीव पावसामुळे भ्रष्टाचाराचे पितळ उघडे करणाऱ्या रस्त्यांनाही करून देणे क्रमप्राप्त ठरले आहे. सप्टेंबर महिन्यात उत्तर भारतात माफक प्रमाणात होणारा पाऊस हा पिकांसाठी पोषक आणि हिवाळ्याची चाहूल देणारा असतो. पण यंदा परतीच्या मान्सूनने निर्माण केलेला क्षणिक गारवा फसवा आणि मोठी किंमत वसूल करणारा ठरणार आहे. दिल्लीसह उत्तर भारताला पावसाळाभर असह्य अशा उष्ण आणि दमट हवामानाचा सामना करावा लागला. मग इतक्या महिन्यांची पर्जन्यवृष्टीची तूट काही दिवसांत भरुन निघाली. त्यामुळे तापमान १० अंश सेल्सिअसने घटले असले तरी ऑक्टोबर महिन्यात निसर्गाचा जीएसटी लागून तापमान पुन्हा ३२-३३ अंश सेल्सिअसवर जाणार आहे.

## ।। अभंगवाणी ।।



वळितें जें गाई ।
त्यासि फार लागे काई ॥१॥
निवे भावाच्या उत्तरीं ।
भलते एके धणी वरी ॥धृ.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### किल्ले रायगडावर शिवसमाधीसमोर पिंडदान?



।मुंबई। महाईन्यूज।

किल्ले रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधी समोरच पिंडदानाचा विधी सुरू असल्याचा व्हिडिओ सध्या चांगलाच व्हायरल झाला आहे. या धक्कादायक प्रकाराने शिवप्रेमींमध्ये संतापाची लाट पसरली आहे. या गंभीर प्रकाराची कसून चौकशी करून तेथे तैनात असलेले पोलीस कर्मचारी आणि पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी संभाजी ब्रिगेडने केली आहे.

शनिवारी रायगड किल्ल्यावर शाक्त पद्धतीने शिवराज्याभिषेक दिन साजरा झाला. त्यावेळी या कार्यक्रमाला संभाजी ब्रिगेडचे राज्यभरातील कार्यकर्ते आणि शिवप्रेमी मोठया संख्येने हजर होते.

# महाराष्ट्र-गुजरात दरम्यान "तानाजी सावंतांना तत्काळ समज द्यावी!

## मराठा क्रांती मोर्च्याच्या नेत्याचा गंभीर इशारा

।मुंबई। महाईन्यूज।

शिंदे गटाचे आमदार आणि राज्याचे आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी रविवारी उस्मानाबादमध्ये हिंदू गर्व गर्जना संवाद यात्रेदरम्यान एक वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. "मराठा आरक्षण गेल्यानंतर दोन वर्ष तुम्ही गप्प होता आणि आता सत्तांतर झाल्यानंतर तुम्हाला आरक्षणाची खाज सुटली. मात्र, आता पुढील दोन वर्षांमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे टिकाऊ आरक्षण मिळवून देतील" असं वक्तव्य तानाजी सावंतांनी केलं होतं.



तानाजी सावंत यांच्या वक्तव्यामुळे समाजात रोष निर्माण झाला असून मराठा क्रांती मोर्चा आक्रमक झाला आहे. आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांना मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी तत्काळ समज द्यावी, अन्यथा याचे गंभीर परिणाम होतील, असा इशारा मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक विनोद पाटील यांनी दिला आहे.

तानाजी सावंत यांच्या वक्तव्यामुळे समाजात रोष निर्माण झाला असून मराठा क्रांती मोर्चा आक्रमक झाला आहे. आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांना मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी तत्काळ समज द्यावी, अन्यथा याचे गंभीर परिणाम होतील, असा इशारा मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक विनोद पाटील यांनी दिला आहे. विनोद पाटील यांनी एक व्हिडीओ जारी करत म्हटलं की, राज्याचे आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी आगळंवेगळं वक्तव्य केलं आहे. या वक्तव्याचा मी जाहीर निषेध करतो. त्यांना एक प्रश्न विचारू इच्छितो की, मागच्या काळात जेव्हा त्यांना मंत्री व्हायचं होतं, तेव्हा हेच मराठा तरुण कार्यकर्ते तुमच्यासाठी शिष्टमंडळ घेऊन जात होते, हे आपण विसरला आहात का? कुणाच्या ताकदीवर आणि कोणत्या गैरसमजात आपण हे वक्तव्य केलं आहे? हे वक्तव्य अतिशय खालच्या दर्जाचं आहे.

"मराठा समाजातील ५० पेक्षा अधिक तरुणांनी बलिदान देऊन हा मराठा क्रांती मोर्चा उभा केला आहे. त्यामुळे राज्यात सरकार कुणाचं आहे आणि कुणाचं नाही, याच्याशी आमचा काहीही संबंध नाही.

राज्यात कुणाचंही सरकार आलं तरी मराठा समाजाच्या तरुणांची मागणी आरक्षणाचीच होती आणि आरक्षणाचीच आहे. आरक्षण मिळेपर्यंत ही मागणी कायम राहील. आम्हाला टिकणारं आरक्षण पाहिजे. आमचं आरक्षण ओबीसीतून टिकणार असेल तर मराठा तरुण ओबीसीतून आरक्षण मागतील," अशी प्रतिक्रिया विनोद पाटील यांनी दिली आहे.



# सरकारमुळेच लाखो बालके कुषोषणाच्या विळख्यात!

## 8 रुपयात पोषण आहार देण्याचे सरकारला आव्हान

।मुंबई। ।महाईन्यूज।

राज्यातील अंगणवाड्यांमधील लक्षावधी बालके तसेच स्तनदा माता व गर्भवती महिलांना पुरेसा व सकस पोषण आहार देण्याची तरतूद न करून सरकारच कुपोषित बालकांची संख्या वाढवू पाहात असल्याचा घणाघाती हल्ला अंगणवाडी सेविका तसेच त्यांच्या संघटनांनी केला आहे. साधा वडापाव १५ रुपयांना तर एक कटिंग चहा ८ रुपयांना विकला जात असताना आठ रुपयात सकाळचा नाश्ता व दुपारचे जेवण तेही पोषण आहार म्हणून देण्याचा आग्रह सरकार कसा करू शकते असा सवाल राज्य अंगणवाडी कृती समितीने केला असून आंदोलनाचा इशारा दिला आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण, आदिवासी तसेच शहरी भागात मिळून ९७ हजार अंगणवाड्या असून यातील ७३ लाख बालके, स्तनदा माता व गर्भवती महिलांना सकस पोषण आहार देण्याची राज्य व केंद्र सरकारची योजना आहे. गेल्या काही वर्षात महागाई रोजच्या रोज वाढत चालली आहे. जवळपास प्रत्येक भाजी आज १०० रुपये किलोने मिळत आहे. डाळी, तांदूळ, गहू, तेल, मिठ व मसाल्यांचे भाव काहीच्या काही वाढलेले असताना २०१७ साली ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील प्रतिबालकाला पोषण आहारापोटी महिला व बाल विकास विभागाच्या माध्यमातून ८ रुपये दिले जायचे. यात सकाळी मुरमुरे, शेंगदाणे, फुटाणे व गुळू आदी वापरून केलेला ६० ग्रॅम वजनाचा लाडू नाश्ता म्हणून तर दुपारच्या जेवणात तांदुळ, डाळ, भाज्या व तेलाचा समावेश असलेली २०० ग्रॅम वजनाची खिचडी देणे अपेक्षित आहे.

गेल्या काही वर्षात महागाई रोजच्या रोज वाढत चालली आहे. जवळपास प्रत्येक भाजी आज १०० रुपये किलोने मिळत आहे. डाळी, तांदूळ, गहू, तेल, मिठ व मसाल्यांचे भाव काहीच्या काही वाढलेले असताना २०१७ साली ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील प्रतिबालकाला पोषण आहारापोटी महिला व बाल विकास विभागाच्या माध्यमातून ८ रुपये दिले जायचे. यात सकाळी मुरमुरे, शेंगदाणे, फुटाणे व गुळू आदी वापरून केलेला ६० ग्रॅम वजनाचा लाडू नाश्ता म्हणून तर दुपारच्या जेवणात तांदुळ, डाळ, भाज्या व तेलाचा समावेश असलेली २०० ग्रॅम वजनाची खिचडी देणे अपेक्षित आहे.

आता २०२२ सालीही राज्य सरकारचे महिला व बाल विकास मंत्रालय याच दराने अंगणवाडी सेविकेने लाखो बालकांना सकस व पोषण आहार द्यावा असा आग्रह धरत आहे. विशेष म्हणजे १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर या कालावधीत महिला बाल विकास मंत्रालयाने वाजता गाजत पाचवा पोषण महिना साजरा करत आहे. यातील गंभीर बाब म्हणजे अनेक अंगणवाड्यात अन्न शिजवण्यासाठी गॅस नाही. परिणामी चुलीवर स्वयंपाक करावा लागत असल्याचे अंगणवाडी सेविकांचे म्हणणे आहे. पूर्वी स्वयंपाकाचा गॅससाठी ४५० रुपये मोजावे लागत होते. आज गॅसची किंमत १०५० रुपये झाला आहे याची सरकारला कल्पना नाही का, असा सवाल राज्य अंगणवाडी कृती समितीच्या नेत्या शुभा शमीम यांनी उपस्थित केला. सरकारे येतात व जातात, दुर्दैवाने प्रत्येक मुख्यमंत्री व महिला बाल विकास मंत्री हे अंगणवाडी सेविका तसेच त्यातील लाखो बालके व स्तनदा मातांच्या पोषण आहाराविषयी असंवेदनशील राहिले आहेत, असेही शुभा शमीम व संगीता कांबळे म्हणाल्या.

# "अतिक्रमण विभागाचे सहाय्यक हातोडा घेऊन अधीशवर..."

## शिवसेनेचा किरीट सोमय्यांना खोचक टोला

।मुंबई ।महाईन्यूज।



केंद्रीय उद्योग मंत्री नारायण राणेंना अधीश बंगल्यातील बांधकाम प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाकडून दणका बसला आहे. उच्च न्यायालयाने दिलेला अनधिकृत बांधकामावरील कारवाईचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवत राणेंची याचिका फेटाळली आहे. यावरून शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी भाजपा नेते किरीट सोमय्यांवर निशाणा साधला आहे.


"जरा कुठेही खुट्ट झालं तरी ज्येष्ठ समाजसुधारक किरीट सोमय्या फार तत्परतेने व्यक्त होतात. अनधिकृत बांधकाम पाडण्यासाठी कोकणात हातात हातोडा घेऊन गेले होते. अधीश बंगल्यातील अनधिकृत बांधकाम पाडण्याबाबत उच्च न्यायालयाने निकाल दिल्यानंतर किरीट सोमय्या शांत होते. ही सहनशीलता सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईलपर्यंत सोमय्यांनी दाखवली आहे," असा खोचक टोला अंधारे यांनी सोमय्यांना लगावला आहे.

### नवरात्रौत्सवात गरबा खेळण्यातून वेळच...

"आता सर्वोच्च न्यायालयाने अधीश बंगल्यातील अनधिकृत बांधकाम पाडण्यास सांगितलं आहे. भाजपाचे पूर्णवेळ ज्येष्ठ सामाजिका कार्यकर्ते आणि अतिक्रमण विभागाचे सहाय्यक किरीट सोमय्या आता हातोडा घेऊन अधीश बंगल्यावर जाण्याचा मुहूर्त कधी काढणार आहेत. की नवरात्रौत्सवात गरबा खेळण्यातून वेळच मिळणार नाही," असा टोमणाही सुषमा अंधारे यांनी सोमय्यांना मारला आहे.

# धार्मिक सौहार्द बिघडवण्याचा प्रयत्न करणाऱ्या 10 यूट्युब चॅनलवरील 45 व्हिडीओंवर बंदी

**।नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**



*धार्मिक विद्वेष पसरवण्याच्या उद्देशाने बनावट बातम्या प्रसारित करणाऱ्या 10 युट्यूब वाहिन्यांवरील 45 व्हिडिओंवर केंद्र सरकारने बंदी घातली आहे. गुप्तचर यंत्रणांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे युट्यूबला ही कारवाई करण्याचे निर्देश माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने दिले आहेत.*

*माहिती तंत्रज्ञान (मध्यस्थ मार्गदर्शक तत्त्वे आणि डिजिटल मीडिया आचारसंहिता) नियम 2021च्या तरतुदींनुसार माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने 23 सप्टेंबरला 2022 रोजी हे निर्देश दिले असून या व्हिडीओंना 1 कोटी 30 लाखांहून अधिक एकत्रित प्रेक्षक संख्या मिळाली होती. हे व्हिडीओ देशाविरुद्ध सतत षडयंत्र रचत होते, देश तोडण्याचा प्रयत्न करीत होते. भीतीचे वातावरण तसेच भ्रम निर्माण करण्याचाही उद्देश त्यामागे होता. खोट्या बातम्या आणि धार्मिक तेढ पसरवण्याच्या उद्देशाने मॉर्फ केलेले हे व्हिडिओ होते. सरकारने काही समुदायांचे धार्मिक अधिकार काढून घेतल्याचे खोटे दावे, धार्मिक समुदायांविरुद्ध हिंसक धमक्या, भारतात सांप्रदायिक युद्ध भडकल्याची घोषणा इत्यादींचा त्यात समावेश आहे. या व्हिडीओंमुळे देशातील धर्मिक सौहार्द तसेच देशातील सार्वजनिक सुव्यवस्था बिघडण्याची भीती होती. काही व्हिडीओ अग्निपथ योजना, भारतीय सशस्त्र दले, भारताची राष्ट्रीय सुरक्षा यंत्रणा, काश्मीर आणि अशाच संबंधित मुद्द्यांवर चुकीची माहिती पसरवण्यासाठी वापरले जात होते. ही सामग्री भारताची राष्ट्रीय सुरक्षा आणि भारताच्या परदेशी देशांबरोबरच्या मैत्रीपूर्ण संबंधांच्या दृष्टीकोनातून चुकीची आणि संवेदनशील असल्याचे आढळले होते.*

*काही व्हिडीओंमध्ये जम्मू-काश्मीर आणि लडाखच्या काही भागांसह भारताची चुकीची सीमारेषा दाखवण्यात आली होती.*

**■ माहिती तंत्रज्ञान (मध्यस्थ मार्गदर्शक तत्त्वे आणि डिजिटल मीडिया आचारसंहिता) नियम 2021च्या तरतुदींनुसार माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने 23 सप्टेंबरला 2022 रोजी हे निर्देश दिले असून या व्हिडीओंना 1 कोटी 30 लाखांहून अधिक एकत्रित प्रेक्षक संख्या मिळाली होती. हे व्हिडीओ देशाविरुद्ध सतत षडयंत्र रचत होते, देश तोडण्याचा प्रयत्न करीत होते. भीतीचे वातावरण तसेच भ्रम निर्माण करण्याचाही उद्देश त्यामागे होता. खोट्या बातम्या आणि धार्मिक तेढ पसरवण्याच्या उद्देशाने मॉर्फ केलेले हे व्हिडिओ होते.**

# गुलाम नबी आझाद यांच्याकडून नव्या पक्षाची घोषणा

## झेंड्याचेही केले अनावरण

**।तेहरान । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**काँग्रेसला रामराम ठोकून भाजपमध्ये प्रवेश केलेल्या गुलाम नबी आझाद यांनी आज नव्या पक्षाची घोषणा केली आहे. गुलाम नबी आझाद यांनी आपल्या नव्या पक्षाला डेमोक्रेटिक आझाद पार्टी असे नाव दिले आहे. आज जम्मू येथे पत्रकार परिषद घेत याबाबत त्यांनी माहिती दिली. यावेळी त्यांनी आपल्या नव्या पक्षाच्या झेंड्याचे अनावरणही केले.**



आपल्या नव्या पक्षाच्या नावाबाबत गुलाम नबी आझाद म्हणाले की, उर्दू, संस्कृतमध्ये सुमारे 1,500 नावे आम्हाला पाठवण्यात आली होती. हिंदुस्थानी हे हिंदी आणि उर्दूचे मिश्रण आहे. पक्षाचे नाव लोकशाही, शांतताप्रिय आणि स्वतंत्र असावे अशी आमची इच्छा होती, म्हणून पक्षाला हे नाव देण्यात आलं असं त्यांनी म्हटलं. आझाद यांनी पक्षाच्या नव्या झेंड्याचं अनावरण केलं. ध्वजाच्या तीन रंगांविषयी माहिती देताना ते म्हणाले की, मोहरीचा रंग विविधतेतील सर्जनशीलता आणि एकता दर्शवतो, पांढरा रंग शांतता दर्शवतो आणि निळा रंग स्वातंत्र्य, मोकळी जागा, कल्पनाशक्ती आणि समुद्राच्या खोलीपासून आकाशाच्या उंचीपर्यंतच्या मर्यादा दर्शवतो.

**⏭ हिंदुस्थानी हे हिंदी आणि उर्दूचे मिश्रण आहे. पक्षाचे नाव लोकशाही, शांतताप्रिय आणि स्वतंत्र असावे अशी आमची इच्छा होती, म्हणून पक्षाला हे नाव देण्यात आलं असं त्यांनी म्हटलं. आझाद यांनी पक्षाच्या नव्या झेंड्याचं अनावरण केलं. ध्वजाच्या तीन रंगांविषयी माहिती देताना ते म्हणाले की, मोहरीचा रंग विविधतेतील सर्जनशीलता आणि एकता दर्शवतो, पांढरा रंग शांतता दर्शवतो आणि निळा रंग स्वातंत्र्य, मोकळी जागा, कल्पनाशक्ती आणि समुद्राच्या खोलीपासून आकाशाच्या उंचीपर्यंतच्या मर्यादा दर्शवतो.**

# आखाती देशांमध्येही पीएफआयची पाळेमुळे!

## हवालाद्वारे पाठवले जायचे भारतात पैसे

**।नवी दिल्ली ।महाईन्यूज ।**

देशविरोधी कारवायांच्या आरोपीखाली तपास यंत्रणा NIA आणि ED ने देशभरात पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडियाशी संबंधित कार्यकर्ते आणि संपत्तीवर छापेमारी केली. दरम्यान पीएफआय संघटनेबाबत आता एक मोठी माहिती समोर येत आहे. पीएफआयची केवळ भारतातचं नाही तर आखाती देश, आणि यूएईमध्ये पाळेमुळे रुजल्याचे समोर आलं आहे. या देशांमधील पीएफआयच्या सदस्यांकडून हवालाद्वारे मोठ्या प्रमाणात भारतात पैसे पाठवले जात होते. राष्ट्रीय तपास संस्थेच्या सूत्रांच्या माहितीनुसार, अनिवासी भारतीयांच्या अकाऊंटचा वापर पीएफआय सदस्य आखाती देशांमधून निधी पाठवण्यासाठी करत होते.

निधी मिळाल्यानंतर हे सदस्य दुसऱ्या अकाऊंटमध्ये तो वर्ग करायचे. नंतर ही रक्कम फिरून पीएफआयपर्यंत पोहोचायची. अहवालानुसार, पीएफआयचे समर्थक आणि सदस्य यूएई, कतार, तुर्की आणि ओमानमध्ये काम करत होते. या देशांकडून ते पीएफआयला आर्थिक मदत करत होते.

**⏭ दरम्यान पीएफआय संघटनेबाबत आता एक मोठी माहिती समोर येत आहे. पीएफआयची केवळ भारतातचं नाही तर आखाती देश, आणि यूएईमध्ये पाळेमुळे रुजल्याचे समोर आलं आहे. या देशांमधील पीएफआयच्या सदस्यांकडून हवालाद्वारे मोठ्या प्रमाणात भारतात पैसे पाठवले जात होते.**

# रशियामध्ये शाळेत अंदाधुंद गोळीबार, लहान मुलांसह १३ जणांचा मृत्यू

## हल्लेखोराची गोळीबारानंतर आत्महत्या

**।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, हल्ल्यात २० जण जखमी झाले आहेत. हल्ल्यात काही लहान मुलंही जखमी झाली आहेत. घटनास्थळी बचाव आणि वैद्यकीय पथक दाखल झालं आहे.**

रशियामध्ये शाळेत झालेल्या गोळीबारात १३ लोकांचा मृत्यू झाला असून, २१ जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये सात लहान मुलांचा समावेश आहे. शहरात हा गोळीबार झाला आहे. गोळीबारानंतर हल्लेखोराने आत्महत्या केल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिलं असल्याचं वृत्त एएफपीने दिलं आहे.

"हल्ल्यामध्ये शाळेचे दोन सुरक्षारक्षक, दोन शिक्षक तसंच पाच लहान मुलांचा समावेश आहे," अशी माहिती रशियाच्या तपास यंत्रणेने टेलिग्रामच्या माध्यमातून दिली आहे. यावेळी त्यांनी हल्लेखोराने आत्महत्या केल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. तपास अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, "हल्लेखोराने काळा शर्ट घातला होता, ज्याच्यावर नाझीचं चिन्ह होतं. त्याच्याकडे कोणतंही ओळखपत्र सापडलेलं नाही. त्याची ओळख पटवली जात आहे". रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, हल्ल्यात २० जण जखमी झाले आहेत. हल्ल्यात काही लहान मुलंही जखमी झाली



# नेहा कक्कर- फाल्गुनी पाठक वादात सोना मोहपात्राची उडी

यिका फाल्गुनी पाठक आणि नेहा कक्कर यांच्यात सुरू असलेल्या वादाची सध्या बरीच चर्चा आहे. नेहाने फाल्गुनी पाठकचे गाणे रिक्रिएट केल्यापासून अनेक मीम शेअर केले जात आहेत ज्यामधून नेहा कक्करची खिल्ली उडवली गेली आहे याबाबत फाल्गुनीने प्रतिक्रिया दिली आहे. मात्र आता हा वाद वाढला असून गायिका सोना महापात्रा हिनेही त्यात उडी घेतली आहे. सोनाने संगीत लेबल आणि बॉलिवूड चित्रपट निर्मात्यांच्या क्रिएटिव्ह टीमला यावर बोलण्याची विनंती केली आहे.नुकतेच नेहा कक्करचे 'ओ



सजना' हे गाणे प्रदर्शित झाले, जे फाल्गुनीच्या मैंने पायल है छनकाई' या गाण्याचा रिमेक आहे. त्याला फाल्गुनी तसेच सोशल मीडियावर लोकांनी नकारात्मक प्रतिक्रिया मिळाल्या. यावर भाष्य करताना सोना मोहपात्राने ट्विटरवर लिहिले की, 'मी फक्त अशी आशा करू शकते की संगीत लेबल आणि बॉलिवुड चित्रपट निर्माते आणि क्रिएटिव्ह टीम अशा शॉर्ट- कटवर बोलतील जे सर्जनशीलतेला मारत आहेत. त्यांच्यावर कारवाई करतील. फाल्गुनी पाठकच्या हिट गाण्याच्या रिमेककडे लक्ष द्या. तसेच, भारतीयांनो, अशा गोष्टींसाठी संघटीत व्हा.नेहा कक्करचं 'ओ सजना' गाणं प्रदर्शित झाल्यानंतर, फाल्गुनीने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीजवर नेहाच्या गाण्यावर मीम्स बनवलेले दाखवत अनेक पोस्ट शेअर केल्या होत्या. फाल्गुनीने शेअर केलेल्या स्टोरीमध्ये एका चाहत्याने तिला नेहाविरोधात गुन्हा दाखल करण्यास सांगितले. रिपोर्ट्सनुसार, फाल्गुनीने त्या स्टोरीवर प्रतिक्रिया दिली आणि म्हणाली, 'असं करण्याची माझी इच्छा आहे, पण माझ्याकडे अधिकार नाहीत.'नुकत्याच एका मुलाखतीत फाल्गुनी पाठकने हे गाणे खराब केल्याबद्दल नाराजी व्यक्त केली होती. गाण्याच्या नवीन व्हर्जनमुळे त्याचा निरागसपणा संपून गेला आहे, असं तिने म्हटलं होतं.

## काही नात्यांना नाव नसतं...'; म्हणत मृणाल कुलकर्णींनी शेअर केलेली पोस्ट

मृणाल कुलकर्णी यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे,जी सध्या चर्चेत आली आहे. खरंतर पोस्ट त्यांच्या नव्या सिनेमा संदर्भातली आहे. सिनेमाचं नाव जितकं कॅची आहे,तितकीच त्याची टॅगलाईन. सिनेमात एक परिपक्व कथा पहायला मिळणार हे सिनेमातील कलाकार पाहिले की लक्षात येईलच आपल्या.प्लॅनेट मराठी' ओटीटी, अ व्हिस्टास कॅपिटल कंपनीने प्रेक्षकांना विविध विषयांवरील अनेक उत्कृष्ट चित्रपट दिले. आता असाच एक दर्जेदार वेबचित्रपट प्लॅनेट मराठी ओटीटीवर प्रदर्शित होण्यासाठी सज्ज झाला आहे. मृणाल कुलकर्णी दिग्दर्शित 'सहेला रे' हा चित्रपट येत्या १ ऑक्टोबर रोजी प्लॅनेट मराठी ओटीटीवर प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

या वेबचित्रपटात मृणाल कुलकर्णी, सुबोध भावे आणि सुमित राघवन यांच्या प्रमुख भूमिका आहेत. नुकतेच सोशल मीडियावर ' सहेला रे'चे पोस्टर झळकले असून ही एक नातेसंबंधावर भाष्य करणारी कथा असल्याचे कळतेय. 'काही नात्यांना नाव नसतं', अशी टॅगलाईन असलेल्या या वेबचित्रपटात मैत्रीच्या पलीकडचे एक संवेदनशील नाते पाहायला मिळणार आहे



## अभिनेत्री जॅकलिनला दिलासा

अभिनेत्री जॅकलीन फर्नांडिसला 200 कोटींच्या मनी लॉँड्रिंग प्रकरणात पतियाळा हाऊस कोर्टाने दिलासा देत अंतरिम जामीन मंजूर केला आहे. 50,000 रुपयांच्या जातमुचलक्यावर अंतरिम जामीन मंजूर करण्यात आला आहे. सुकेश चंद्रशेखर मनी लॉँड्रिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) जॅकलीनविरुद्ध आरोपपत्र सादर केल्यानंतर तिला आज न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते. 'सुकेश चंद्रशेखरने खंडणीसह गुन्हेगारी कृत्यांमधून जॅकलीन फर्नांडिसला ५.७१ कोटींच्या विविध भेटवस्तू दिल्या होत्या. चंद्रशेखर बराच काळ तिचा साथीदार होता. सुकेशने सहआरोपी पिंकीच्या माध्यमातून जॅकलीनला या भेटवस्तू दिल्या होत्या' असे ईडीने एका निवेदनात म्हटले होते. चंद्रशेखरने फर्नांडिसला भेटवस्तू देण्यासाठी बेकायदेशीर पैशांचा वापर केला, असा आरोपही



## मन कस्तुरी रे'चा दरवळ!

मराठी मनोरंजन विश्वात मनसोक्त मुशाफिरी करणाऱ्यांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. नवरात्रीच्या निमित्तानं एका चित्रपटाच्या प्रदर्शनाची घोषणा करण्यात आली आहे. नवरात्री म्हटलं की नवचैतन्य, जोश, उल्हास. हेच सुंदर वातावरण अधिकच बहारदार आणि रंगमय करण्यासाठी मुंबई मुव्हिस स्टुडिओज घेऊन आले आहे 'मन कस्तुरी रे'चे नवे पोस्टर. नवरात्रीच्या निमित्ताने हे पोस्टर सोशल मीडियावर झळकले असून यात तेजस्वी प्रकाश आणि अभिनय बेर्डे प्रेमाच्या रंगात दंग होऊन नाचताना दिसत आहेत. संकेत माने दिग्दर्शित 'मन कस्तुरी रे' येत्या ४ नोव्हेंबर रोजी हा चित्रपट सिनेमागृहात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

हिंदी सिनेसृष्टीतील कलाकारांचा मराठी सिनेमांसाठीचा रस वाढत असतानाच तेजस्वी प्रकाश हिने 'मन कस्तुरी रे' या मराठी सिनेमातून मराठी सिनेसृष्टीत पदार्पण केले आहे. यानिमित्ताने तेजस्वीने सोशल मीडियावर नवरात्रीच्या शुभेच्छा देत आपल्या या पोस्टरबाबत खूप उत्सुक असल्याचे सांगितले. तिचा हा व्हिडिओ सध्या खूप व्हायरल होत आहे. मराठमोळ्या तेजस्वीची पहिल्यांदाच मराठी सिनेमातील दमदार झलक पाहायला सर्वच प्रेक्षकवर्ग आतुर असतानाच आता तेजस्वी प्रकाश आणि अभिनय बेर्डेचे नाचतानाचे एक जबरदस्त पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. पोस्टरमधील या दोघांची कमाल केमेस्ट्री प्रेक्षकांची सिनेमासाठीची उत्सुकता अधिकच वाढवत आहे. पोस्टरवरून ही एक सुंदर प्रेमकहाणी असल्याचे दिसत आहे. त्यामुळे यंदाच्या नवरात्रीत अभिनय आणि तेजस्वीच्या' मन कस्तुरी रे' चा सुगंध सर्वत्र दरवाळणार, हे नक्की! नितीन केणी यांच्या नेतृत्वाखाली मुंबई मुव्ही स्टुडिओज प्रस्तुत, व्यंकट अत्तिली, मृत्यूंजय किचंबरे यांच्या आयएनइएनएस डायमेंशन एन्टरटेनमेंट अॅण्ड आर्ट्स निर्मित या चित्रपटाचे सहनिर्माते ड्रॅगन वॉटर फिल्म्सचे निशीता केणी आणि करण कोंडे आहेत. वितरणाचे काम युएफओ सिने मीडिया नेटवर्कने पाहिले आहे.



## शॉर्ट न्यूज »

### लेव्हर चषक टेनिस स्पर्धा : जोकोव्हिचचे दमदार पुनरागमन



**। लंडन । महाईन्यूज**

दोन महिन्यांच्या विश्रांतीनंतर नोव्हाक जोकोव्हिचने टेनिस कोर्टवर दमदार पुनरागमन करताना लेव्हर चषक टेनिस स्पर्धेत युरोप संघासाठी एकेरी आणि दुहेरीच्या लढतीत विजयांची नोंद केली. त्याच्या कामगिरीमुळे युरोप संघाने जागतिक संघाविरुद्ध ८-४ अशी आघाडी घेतली आहे. जोकोव्हिचने एकेरीत जागतिक संघाच्या फ्रान्सिस टिआफोचा ६-१, ६-३ असा सहज पराभव केला. त्यानंतर तासाभरात त्याने इटलीच्या माटेओ बेरेट्टिनीच्या साथीने जागतिक संघाच्या जॅक सॉक-ॲलेक्स डी मिनौर जोडीला ७-५, ६-२ असे पराभूत केले. विम्बल्डन स्पर्धेनंतर कोविड लस न घेतल्यामुळे जोकोव्हिचला अमेरिकेत झालेल्या विविध स्पर्धापासून दूर राहावे लागले.

भारत-ऑस्ट्रेलिया ट्वेन्टी-20 मालिका

# भारताचा मालिका विजय

## ऑस्ट्रेलियावर सहा गडी राखून सरशी

**।हैदराबाद । महाईन्यूज ।**

सूर्यकुमार यादव (३६ चेंडूंत ६९ धावा) आणि विराट कोहली (४८ चेंडूंत ६३) यांच्या झंझावाती अर्धशतकांच्या जोरावर भारताने तिसऱ्या आणि निर्णायक ट्वेन्टी-२० क्रिकेट सामन्यात ऑस्ट्रेलियावर सहा गडी आणि एक चेंडू राखून सरशी साधली. या विजयासह भारताने तीन सामन्यांची मालिका २-१ अशी फरकाने जिंकली.



हैदराबाद येथे झालेल्या तिसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने दिलेले १८७ धावांचे आव्हान भारताने १९.५ षटकांत पूर्ण केले. भारताच्या डावाची सुरुवात अडखळती झाली. सलामीवीर केएल राहुलला (१) डावखुरा वेगवान गोलंदाज डॅनियम सॅम्सने पहिल्याच षटकात माघारी पाठवले. तसेच गेल्या सामन्यातील भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावणारा कर्णधार रोहित शर्माही केवळ १७ धावा करून पॅट कमिन्सच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्यामुळे भारताची २ बाद ३० अशी स्थिती झाली होती. सूर्यकुमार (पाच चौकार व पाच षटकार) आणि कोहली (तीन चौकार आणि चार षटकार) या जोडीने प्रतिहल्ला करत ऑस्ट्रेलियन गोलंदाजांवर दडपण टाकले. या दोघांनी तिसऱ्या गड्यासाठी १०४ धावांची भागीदारी रचत भारताच्या विजयाच्या आशा कायम ठेवल्या. सूर्यकुमार मोठा फटका मारण्याच्या नादात ६९ धावांवर बाद झाला. परंतु कोहलीला हार्दिक पंड्याची (१६ चेंडूंत नाबाद २५) तोलामोलाची साथ लाभली.

अखेरच्या षटकात भारताला विजयासाठी ११ धावांची आवश्यकता होती. कोहलीने पहिल्या चेंडूवर षटकार मारल्यानंतर सॅम्सने त्याला माघारी पाठवले. मात्र, दोन चेंडूंत चार धावांची गरज असताना हार्दिकने चौकार मारत भारताचा विजय साकारला. तत्पूर्वी, ऑस्ट्रेलियाने २० षटकांत ७ बाद १८६ अशी धावसंख्या उभारली. कॅमेरुन ग्रीनने सुरुवातीपासून फटकेबाजी करताना २१ चेंडूंत सात चौकार आणि तीन षटकारांच्या साहाय्याने ५२ धावांची खेळी केली. अक्षर पटेलपुढे ऑस्ट्रेलियाची मधली फळी ढेपाळली.

परंतु टीम डेव्हिडने २७ चेंडूंत दोन चौकार आणि चार षटकारांसह ५४ धावांची खेळी करताना ऑस्ट्रेलियाकडून पहिले अर्धशतक केले. सॅम्सने (२० चेंडूंत नाबाद २८) अखेरच्या षटकांत फटकेबाजी करत ऑस्ट्रेलियाला १८० धावांपलीकडे पोहोचवले.

### संक्षिप्त धावफलक

ऑस्ट्रेलिया : २० षटकांत ७ बाद १८६ (टीम डेव्हिड ५४, कॅमेरुन ग्रीन ५२; अक्षर पटेल ३/३३) पराभूत वि. भारत : १९.५ षटकांत ४ बाद १८७ (सूर्यकुमार यादव ६९, विराट कोहली ६३, हार्दिक पंड्या नाबाद २५; डॅनियल सॅम्स २/३३)

# कुलदीपच्या हॅट्रिकमुळे भारत-अ संघाचा विजय!

न्यूझीलंड-अ संघाचा चार गडी राखून पराभव केला



**। चेन्नई । महाईन्यूज ।**

'चायनामन' फिरकीपटू कुलदीप यादवने हॅट्रिकसह चार बळी मिळवल्यानंतर पृथ्वी शॉने (४८ चेंडूंत ७७ धावा) केलेल्या फटकेबाजीच्या जोरावर भारत-अ संघाने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात न्यूझीलंड-अ संघाचा चार गडी राखून पराभव केला. यासह भारत-अ संघाने तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे.

प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंड-अ संघाचा डाव ४७ षटकांत २१९ धावांवर आटोपला. जो कार्टरने ७२, तर रचिन रिवद्रने ६१ धावांचे योगदान दिले. कुलदीपने लोगन व्हॅन बिक (४), जॉ वॉकर (०) आणि जेकब डफी (०) यांना सलग तीन चेंडूंवर बाद करत हॅट्रिक साकारली. त्याने ५१ धावांत चार गडी बाद केले. त्याला राहुल चहर आणि रिषी धवन यांनी प्रत्येकी दोन गडी बाद करून सुरेख साथ केली.

त्यानंतर पृथ्वीच्या तडाखेबंद खेळीमुळे भारत-अ संघाने २२० धावांचे लक्ष्य ३४ षटकांत सहा गड्यांच्या मोबदल्यात गाठले. पृथ्वीला ऋतुराज गायकवाड (३०), संजू सॅमसन (३७) यांची साथ मिळाली.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही